परिशिष्ट-III

अग्निसुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत हमीपत्र

मी / आम्ही ----------------------------------------, वय वर्ष -----, याद्वारे प्रतिपादन करतो की, मी आम्ही/भारतीय रहिवासी/ ---------------------------------------- या संस्थेचा अध्यक्ष/सचिव/ अधिकृत स्वाक्षरीकर्ता असून संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता -----------------------------------------------------आहे.

(1) आमच्या संस्थेचा नोंदणी क्रमांक ___________________________ आहे.

(2) मी/आम्ही असे प्रतिपादन करतो की, मी/आम्ही ---------------------------------------- या ठिकाणी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी तात्पुरता मंडप उभारण्याच्या परवानगीसाठी विभाग कार्यालयात अर्ज केला आहे.

(3) मी/आम्ही असेही प्रतिपादन करतो की, मी/आम्ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मुंबई अग्निशमन दलाकडून प्रसारीत केलेल्या सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजनांचा (Codified Fire Safety Measures) अभ्यास केला आहे .मी/आम्ही अशी हमी देतो की, नमूद सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजनांचे (Codified Fire Safety Measures) मी/आम्ही पूर्णपणे पालन करु तसेच ज्याव्दारे आग लागेल अशी किंवा नियमबाहय कोणतीही कृती मी/आम्ही करणार नाही.

(4) मी/आम्ही अशी हमी देतो की, मंडपामध्ये विद्युत उपकरणे अथवा संसाधने बसविताना ती मान्यताप्राप्त विद्युत निरीक्षक यांच्याकडून प्रचलित विद्युत कायदा आणि नियमामधील तरतुदीनुसार बसवून घेऊ.

(5) मी/आम्ही अशी हमी देतो की, “महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६” च्या कलम ३ (१) मधील आणि नियम २००९ मधील तरतुदीनुसार, अग्निसुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करुन, सर्व अग्निसुरक्षा उपकरणे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी सर्वस्वी माझी/आमची राहिल.

(6) मला/आम्हाला याची जाणीव आहे की, मी/आम्ही “महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६” नुसार निर्धारित केलेल्या अग्निसुरक्षा उपाययोजना तसेच मुंबई

अग्निशमन दलाकडून निश्चित केलेल्या सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजना (Codified Fire Safety Measures) मधील निर्देशांचे पालन न केल्याचे आढळल्यास अथवा सदर परवानगी व्यतीरिक्त तात्पुरते किंवा पक्के बांधकाम केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

(7) मला /आम्हांस मुंबई महानगरपालिकेकडून मिळणाया परवानगी सापेक्ष मी/आम्ही असे नमूद करतो की, महानगरपालिका आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, त्यांचे अधिकारी, कर्मचारी व अभिकर्ता यांना, त्यांच्या विरोधात करण्यात येणारी कोणतीही कारवाई, नुकसान भरपाई, मागणी, दावे इत्यादीपासून या हमीपत्राव्दारे बंधमुक्त करीत आहे/आहोत. उपरोक्त बाबीस मी/आम्ही जबाबदार असल्याचे याव्दारे मान्य करीत आहे/आहोत व त्याची सर्वस्वी जबाबदारी मी/आम्ही स्वेच्छेने घेत आहे/आहोत.

(8) मला/आम्हांला याची पूर्णपणे जाणीव आहे की, मी/आम्ही सादर केलेली माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास, मी/आम्ही दिवाणी तसेच फौजदारी कारवाईस पात्र असेन/ असू आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परवानगी शुल्क ठेवीची रक्कम असल्यास ती जप्त केली जाईल.

(9) मी/आम्ही असेही प्रतिपादन करतो की, सदर हमीपत्र मला/आम्हांला/संस्थेचे अध्यक्ष, सचिव, व्यवस्थापकीय समिती व सदस्यांवर बंधनकारक राहिल व मी/आम्ही वेळोवेळी केलेल्या कृतीसाठी जबाबदार राहू.

मी/आम्ही असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, उपरोक्त माहिती ही माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी व अचूक असून मी/आम्ही स्वतः पडताळली आहे.

(------------------------------)
सार्वजनिक उत्सव मंडळ अध्यक्ष नाव व स्वाक्षरी–

(------------------------------)
सार्वजनिक उत्सव मंडळ सचिवाचे नाव व स्वाक्षरी –